२०१३-२०१४

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## १३ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०१३ -३१ मार्च २०१४

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## १३ वा वार्षिक अहवाल

(१ एप्रिल २०१३ - ३१ मार्च २०१४)

वाय २१९०-१

अनुक्रमणिका


| प्रस्तावना | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| १. प्रास्ताविक | १ |
| २. आयोगाचे कार्य | २ |
| ३. आयोगाने हाताळलेल्या तक्रारी | ३ |
| ४. अटक उप समितीचे अधिकार | ७ |
| ५. मानवी हक्कांचे संवर्धन | १० |
| ६. प्रशासकीय बाब आणि साधनसामग्री पुरवठा | ११ |
| ७. आयोगाने निर्णय दिलेली प्रकरणे | १२ |
| ८. मानवी हक्कांचे महत्त्व आणि संकल्पना | २३ |

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपति शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : २२०३ ४२३३ ● फॅक्स : २२०९ १८०४

## प्रस्तावना

मानवी हक्क आयोग हा मुख्यत: सरकारी अधिकारी यांनी केलेल्या मानवी हक्क भंगाच्या तक्रारींशी निगडीत आहे. कायदेशीर तरतुदीनुसार मानवी हक्क आयोगाचा उद्देश हा या तक्रारींना विचारात घेणे आणि मानवी हक्कांची पायमल्ली झालेले आढळल्यास त्यावर कारवाई करणेचे आहे. या तक्रारींना हाताळताना मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या संबंधित तरतुदीनुसार, व्यक्तिचे हक्क मिळवून देण्याचे प्रयत्न करणे व त्या हक्कांना सरंक्षण प्रदान करणे हा आयोगाचा दृष्टीकोन आहे.

सद्य:स्थितीत मानवी हक्क आयोगाने तक्रारीचे निवारणांची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरु केल्याने जनता अंशत: समाधानी झाल्याचे पाहून आयोगास आनंद वाटत आहे. ही बाब येथे लक्षात घेण्यासारखी आहे की सध्याचे मा. अध्यक्ष व मा. सदस्य यांनी सप्टेंबर, २०१३ मध्ये कार्यभार स्वीकारला. या अगोदर जवळ जवळ २० महिने मानवी हक्क आयोगाचे कार्य बंद होते. आयोगाला अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबद्दल पूर्ण जाणीव असून येत्या काही वर्षात प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा होण्याचे उद्देशाने आयोगाने अनेक उपाययोजना आखल्या आहेत.

आयोगाने वार्षिक अहवाल बनविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले असून आणि आम्हाला वर्ष २०१३ - १४ चा अहवाल मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ चे कलम २८ नुसार मा. विधानसभेपुढे सादर करताना आनंद होत आहे.

श्री. भगवंतराव डी. मोरे
सदस्य.

न्यायमूर्ती. श्री. एस. आर. बन्नूरमठ
अध्यक्ष.

स्थळ : मुंबई

दिनांक :

प्रकरण - १

**प्रास्ताविक :**

१.१ हा आयोगाचा १३ वा वार्षिक अहवाल असून त्याचा कार्यकाळ १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ असा आहे.

१.२ महाराष्ट्र शासनाने मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या तरतुदीनूसार ६ मार्च २००१ रोजी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना केली. मानवी हक्क आयोगाची स्थापना शासकीय निर्णय क्र. एच.आर.सी. १०९९/३७८/पी १०-१४, दि. १५ जानेवारी २०००, गृह विभाग नुसार केले. आयोग हा ६ मार्च २००१ रोजी कार्यान्वित झाला.

संयुक्त राष्ट्रसंघ हा त्याच्या उपलब्ध साधनांनुसार आंतरराष्ट्रीय तसेच प्रादेशिक विभागात संपूर्ण जगात एकाच पद्धतीने मानवी हक्कांची प्रसार आणि संरक्षणाची कार्य करीत आहे.

१.३ या अहवाल काळात माननीय अध्यक्ष न्यायमुर्ती श्री. एस.आर. बन्नूरमठ आणि मा. सदस्य श्री. भगवंतराव डी. मोरे आयोगात कार्य करीत आहेत. तथापि एका मा. सदस्याचे पद अद्यापही रिक्त आहे.

१.४ मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या तरतुदीनुसार आयोग हा मानवी हक्कांचे उल्लंघनाबाबत स्वतःहून चौकशी करू शकतो, किंवा अन्यायग्रस्त व्यक्तिने स्वतः अथवा त्याचेवतीने प्रतिनिधी म्हणून कोणत्याही व्यक्तिने याचिका केली असेल तर त्याची चौकशी करणे अथवा कोणत्याही न्यायालयापुढे मानवी हक्क भंगाबाबत एखादे प्रकरण प्रलंबित असेल तर त्यात न्यायालयाचे परवानगीने भाग घेणे. तसेच आयोग शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये आणि जनमाणसात मानवी हक्क विषयक जाणीव निर्माण करण्याचे कर्तव्याने बांधील आहे.

**रचना :**

१.५ माननीय, न्यायमुर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ निवृत्त मुख्य न्यायाधीश उच्च न्यायालय केरळ यांनी दिनांक १२ सप्टेंबर २०१३ रोजी या आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारला. श्री. भगवंतराव डी. मोरे निवृत्त भा.पो.से. यांनी दि. १६ सप्टेंबर २०१३ रोजी आयोगाचे सदस्य म्हणून कार्यभार स्वीकारला.

## प्रकरण - २

**आयोगाची कार्य :**

मानवी हक्क कायदा, १९९३ कलम १२ प्रमाणे आयोग मानवी हक्कासाठी आयोग खालील सर्व किंवा त्यापैकी कोणतेही कार्य पार पाडील.

१. स्वतःहून अन्यायग्रस्त प्रकरणात चौकशी करणे किंवा अन्यायग्रस्त व्यक्तीच्या अर्जावर चौकशी करणे.

(अ) मानवी हक्कांचा भंग किंवा त्यास प्रोत्साहन देणे किंवा ;

(ब) अशा हक्क भंगास प्रतिबंध करण्यास लोकसेवकाकडून झालेला निष्काळजीपणा.

२. मानवी हक्कांचा भंग झाल्याचा कोणताही आरोप असलेल्या व कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या न्यायालयाच्या संमतीने हस्तक्षेप करील ;

३. राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरुंगात किंवा अन्य एखाद्या संस्थेत उपचाराच्या, सुधारण्याच्या किंवा सुरक्षततेच्या प्रयोजनार्थ व्यक्तीस स्थानबद्ध केलेले किंवा ठेवून घेण्यात आलेले असेल त्या तुरुंगाला वा संस्थेला राज्य शासनाला सूचना देऊन त्या आवासी व्यक्तींच्या तेथील राहणीमानाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भेट देईल आणि त्यासंबंधी शिफारस करेल;

४. संविधानाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पुरवण्यात आलेल्या संरक्षक उपायांचा आढावा घेईल व त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाय योजनांची शिफारस करील;

५. मानवी हक्कांच्या उपभोगामध्ये प्रतिबंध करणाऱ्या दहशतवादी कृत्यास असलेल्या घटकांचे, पुर्नविलोकन करून त्यावर उचित सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करील;

६. मानवी हक्काच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेईल व त्यास चालना देईल ;

७. मानवी हक्कांबाबतची जाण समाजाच्या विविध वर्गात निर्माण करण्यासाठी जागृती करणे आणि प्रकाशने, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधने याद्वारे मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षक उपाययोजनांची माहिती करून देण्यासाठी चालना देईल;

८. मानवी हक्कांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संघटना आणि संस्था यांना ते करीत असलेल्या प्रयत्नांना उत्तेजन देईल ; आणि

९. खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थांना प्रोत्साहन देणे, मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करील.

## प्रकरण ३

**आयोगाने हाताळलेल्या तक्रारी :**

३.१ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने त्यांचे स्थापनेनंतर १३ व्या वर्षात प्रवेश केलेला आहे. असे लक्षात येते की, सद्य:स्थितीत आयोगावर कार्यरत असलेले मा. अध्यक्ष व मा. सदस्य यांनी कार्यभार स्वीकारल्या नंतर मानवी हक्कांच्या महत्त्वाबद्दल आणि विशेषत: मानवी हक्क आयोगाच्या कार्याबद्दल प्रसार माध्यमे , भाषणे आणि संवाद, विचारांच्या देवाण घेवाणीतून सातत्यपूर्ण जागृती, प्रसार केल्यामुळे मोठ्या प्रमाणात आयोगास वेगवेगळ्या स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त होऊ लागल्या आहेत. ही स्वागतार्ह बाब आहे.

**सांख्यिकी माहिती :**

३.२ या अहवाल काळात म्हणजे वर्ष २०१३-२०१४ मध्ये आयोगास एकूण ५१७० नवीन प्रकरणे प्राप्त झाली. दिनांक १ एप्रिल २०१३ ते दिनांक ३१ मार्च २०१४ या काळात १२७४ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

३.३ मा. आयोगाने या काळात २३ प्रकरणात सुमोटो (स्वयं:खुद्द) दखल घेतली.

**तक्रारीचे स्वरूप :**

३.४ आयोगाला प्राप्त झालेल्या ५१७० तक्रारींचा विश्लेषणात्मक अभ्यास केला गेला व त्याखालीलप्रमाणे वर्गीवारीनुसार विभागल्या आहेत :

**१. पोलीस विभागाविरुद्ध तक्रारी :** ह्या तक्रारींमध्ये मुख्यत: पोलिसांकडून अधिकाराचा दुरुपयोग, तक्रार नोंदण्यास नकार, खोटया प्रकरणात अडकविले, बेकायदेशीर कोठडीत ठेवणे, भ्रष्टाचार इ. चा समावेश होतो. - ............................................... (१७३६)

**२. अल्पवयीन मुलांविषयी तक्रारी** : ह्या प्रकारात दूरुपयोग, लैंगिक छळ, हल्ला, वाईट वागणूक, इत्यादींचा समावेश होतो. ............................................................................................................... (१९)

**३. आरोग्यविषयक तक्रारी :** ह्या तक्रारींमध्ये शारीरिक अपंग व्यक्तिंचे शोषण, सार्वजनिक आरोग्यास धोका तसेच वैद्यकीय व्यावसायीकांच्या विरोधातील तक्रारी इ. प्रकारच्या तक्रारींचा समावेश होतो. - ............................................... (४८)

**४. तुरुंगाविरुद्ध तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारींमध्ये कैद्यांचे मानवी हक्क जसे, छळ, धमकावणे, अधिकाराचा दुरुपयोग, चूकीची वागणूक इत्यादींचा समावेश होतो. ............................................................................... (४५)

**५. न्यायपालिका आणि न्यायीक अधिकारीविरुद्ध तक्रारी** ............................................................... (१०)

**६. सराईत गुन्हेगारांविरुद्ध तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारीत संघटित गुन्हेगारांमार्फत आणि असामाजिक व्यक्तींमार्फत, खंडणी, अपहरण, धमकावणे, इत्यादी तक्रारींचा समावेश होतो. ............................................................ (१७)

**७. कामगारांचे मानवी हक्क भंगाविषयी तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारींमध्ये मालकांनी कामगारांचे मानवी हक्क भंग केल्याच्या तक्रारींचा समावेश होतो. .............................................................................................. (२३)

**८. अनुसूचित जाती व जमाती तसेच इतर अल्पसंख्याकावर होणाऱ्या अत्याचारासंबंधी तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारींमध्ये शासकीय कर्मचारी आणि इतर व्यक्तिनी अनुसूचित जाती व जमाती आणि अल्पसंख्याकावर केलेल्या अत्याचाराच्या तक्रारींचा समावेश होतो. .................................................................................................. (८०)

**९. प्रदुषण/पर्यावरणविषय तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारीत पर्यावरण दूषित करणाऱ्या प्रदूषणाबाबत आणि मानवी हक्कांवर परिणाम करणाऱ्या प्रदूषणाबाबत तक्रारींचा समावेश होतो.............................................................. (०५)

१०. स्थलांतरित /धर्मांविषयी तसेच झोपडपट्टीवासियांची हक्क उल्लंघनाबाबत तक्रारी. ........................................ (०२)

**११. नोकरीविषयक तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारींमध्ये सेवा संधीमध्ये होणारे भेदभाव तसेच सेवानिवृत्ती / नुकसानभरपाई रक्कम अदा न करणे आणि इतर नोकरीविषयक वादांचा समावेश होतो.............................................................. (६५०)

**१२. महिलांविषयक तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारींमध्ये अपहरण, बलात्कार, खून, लैंगिक भेदभाव, हुड्यांकरिता छळ अथवा मृत्यू, विवाहविषयक वाद इत्यादींचा समावेश होतो....................................................................... (१०८)

**१३. विशेष कायद्याबद्दल तक्रारी :** या प्रकारात विशेष कायद्यामुळे स्थानबद्ध व्यक्तींचे छळ किंवा दुरुपयोग यांचा समावेश होतो ........................................................................................................................ (००)

**१४. संकीर्ण तक्रारी :** या प्रकारच्या तक्रारींमध्ये जमिनविषयक तक्रारी, कौटुंबिक तक्रारी, बेपत्ताविषयक तक्रारी, समाजातील कमकुवत वर्गावर बेकायदशीर, अन्यायकारक अत्याचार, समाजाच्या असंरक्षित घटकांचा छळ होणे तसेच आदिवासींचे मानवी हक्क भंग इत्यादींचा समावेश होतो. ........................................................................................................ (२४२७)

३.५ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यप्रणाली) विनियमन, २०११ च्या विनियमन १२ नुसार खालील प्रकारच्या तक्रारींची सामान्यपणे आयोग दखल घेत नाही.

**विनियम १२**

(ए) संदिग्ध, निनावी, खोट्या नावाने, अस्पष्ट, शुल्लक किंवा खोट्या ;

(बी) कायदा कलम ३६ (१) नुसार बाधा असलेली प्रकरणे; जेव्हा वाद विषय हा दुसऱ्या आयोगापुढे प्रलंबित असेल;

(सी) कायदा कलम ३६ (२) नुसार बाधा असलेली प्रकरणे; जेव्हा तक्रार ही मानवी हक्क उल्लंघनाच्या घटनेच्या एक वर्षानंतर सादर केलेली असेल.

(डी) कायदा कलम २१ (५) नुसार बाधा असलेली प्रकरणे; जेव्हा तक्रारी राज्य शासनाच्या विषयाशी संबंधित नसेल. उदा. रेल्वे, संरक्षण इत्यादी.

(ई) जेव्हा दिवाणी बाबींशी संबंधित असेल; जसे मालमत्ताविषयक हक्क, करारविषयक बंधणे आणि कौटुंबिक विवाहाविषयक वाद.

(एफ) जेव्हा नोकरीविषयक बाबीशी संबंधित असेल किंवा कामगार अथवा औद्योगिक वादविषयक ;

(जी) कोणत्याही सरकारी नोकराच्या विरोधात आरोप नसलेली;

(एच) मानवी हक्क भंगाविषयक विशिष्ट आरोप नसलेली;


(आय) वादविषय कोणत्याही न्यायालय किंवा लवादापुढे न्यायप्रविष्ट असेल ;

(जे) वादविषयाबाबत न्यायालयाने किंवा आयोगाने आदेश केलेला असेल;

(के) ज्यावेळी तक्रार ही इतर प्राधिकरणाला उद्देशुन केलेली असेल आणि फक्त त्याची प्रत आयोगाला पाठविली असेल तर;

(एल) आयोगाच्या कार्यकक्षेबाहेरील बाबी.

**या वर्षात आयोगाकडे आलेला तक्रारींच्या प्रकारांचे विभाजन आलेखाद्वारे सादरीकरण खालीलप्रमाणे केले आहे:—**



३.६ आयोगाकडे कायद्यान्वये चालणाऱ्या प्रकरणांमध्ये (संकीर्ण तक्रारीं व्यतिरिक्त)सर्वात जास्त प्रकरणे पोलीस दलाविरुद्ध आहेत या बाबींची नोंद घेणे आवश्यक आहे. या बाबींची गंभीरपणे दखल घेतलेली आहे व आयोगातर्फे पोलीस व जिल्हास्तरीय प्रशासन यांचेसाठी शिक्षण व जागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

३.७ माठ्या प्रमाणावर आयोगाकडे अशी प्रकरणे आली की, जी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (प्रक्रिया) विनियम, २०११ च्या विनियमन १२ प्रमाणे आयोगाकडे न चालणारी आणि /किंवा आयोगाच्या कार्यकक्षेच्या बाहेरील आहेत. यावरून असे दिसते की आयोगाचे अधिकार व कार्य याबद्दल शिक्षण व जनजागृतीची कमतरता आहे. या समस्येला आळा घालण्यासाठी उपाययोजना ठरवलेली आहेत. आयोगाचे सदस्य शिक्षण व जनजागृती वाढविण्यासाठी विविध ठिकाणी भेटी व व्याख्याने देऊन त्यासाठी पावले उचलली जात आहेत.

३.८ **आयोगाने स्वयंखुद्द दखल घेतलेली प्रकरणे (सुमोटो):**

**सामान्यतः** आयोग हा तक्रारदाराकडून किंवा त्याच्या वतीने कोणीही तक्रार केल्यास त्यावर कार्यवाही करतो.

परंतु, मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ नुसार आयोगास स्वयंखूद्द (सुमोटो) मानवी हक्क उल्लंघनाची चौकशी करण्याचे अधिकार आहेत.

**या अहवाल वर्षात आयोगाने खालील प्रकरणांत स्वयंखुद्द (सुमोटो) दखल घेतली :—**

१. कांदिवली येथे ट्रकने ज्वलनशील पदार्थ सांडून मुले जखमी (टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई दिनांक २० सप्टेंबर २०१३).

२. खार येथील रहिवाश्यांच्या मुंबई महानगरपालिकेने पुरविलेल्या पिण्याच्या पाण्यात जंतू आढळले. (इंडियन एक्सप्रेस, मुंबई दिनांक २० सप्टेंबर २०१३).

३. अवकाळी पावसाने नाशिक विभागात जीवन आणि मालमत्तेचे नुकसान (इंडियन एक्सप्रेस,मुंबई दिनांक २० सप्टेंबर २०१३).

४. पोलादपूर येथील महामार्गाच्या असुरक्षित अवस्थेमुळे जनतेचे विशेषतः विद्यार्थ्यांचे आयुष्य धोक्यात (लोकमत, दिनांक २५ सप्टेंबर २०१३)

५. डॉकयार्ड मुंबई येथे बहुमजली ईमारत कोसळून मानवी जीवनाचे नुकसान तसेच बेघर व्यक्तींच्या पुनर्वसनाचा अभाव. (वृत्तपत्र आणि दूरदर्शन बातमी).

६. दहिसर - गोरेगाव रहिवाशी येथे सांडपाण्याचा अयोग्य विल्हेवाट (वृत्तपत्र बातमी).

७. गोवंडी येथे कोठडीतील मृत्यू, (मुंबई मिरर, दिनांक २७ सप्टेंबर २०१३).

८. भूमि अधिग्रहण कार्यवाहीतील दोषामुळे नक्षलवादात वाढ, (वृत्तपत्र बातमी).

९. पदपथावरील भटक्या जमातींना मुंबई महानगरपालिका पोलिसांमार्फत विस्थापन, (वृत्तपत्र बातमी).

१०. आदिवासी मुलांचे कुपोषण. (वृत्तपत्र बातमी).

११. जात पंचायतीने कुटुंबास वाळीत टाकले, (वृत्तपत्र बातमी).

१२. चेंबूर येथे सार्वजनिक स्वच्छतागृहात स्फोट होऊन जखमी, (वृत्तपत्र बातमी).

१३. तुर्भे येथे गॅस गळती, (वृत्तपत्र बातमी).

१४. बलात्काराच्या गुन्ह्याची तक्रार नोंद नोंदण्यास पोलीसांकडून नकार, (वृत्तपत्र बातमी).

१५. कलाकारास पोलिसांकडून बेकायदेशीर अटक आणि मारहाण करून शारिरीक नुकसान, (वृत्तपत्र बातमी).

१६. सांडपाण्याची गळती होवून तळ्याचे पाणी प्रदूषित, (वृत्तपत्र बातमी).

१७. धोकादायक इमारतीमुळे माटुंगा कामगार वसाहतीतील रहिवाश्यांचे जीवन धोक्यात, (वृत्तपत्र बातमी).

१८. मध्यान्ह भोजन योजनेत ४१७ शाळकरी मुलांना अन्नातून विषबाधा, (वृत्तपत्र बातमी).

१९. हरविलेल्या मुलीचा तपासकामी पोलिसांचा निष्काळजीपणा, (वृत्तपत्र बातमी).

२०. महिलेवरती हल्ला प्रकरणी तक्रार नोंदण्यास विलंब, (वृत्तपत्र बातमी).

**कोठडीतील मृत्यू प्रकरणे :**

३.९ आयोगाला यावर्षी एकूण ३०० कोठडीतील मृत्यूबद्दल सूचना प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | कोठडीचा प्रकार | एकूण |
|---|---|---|
| १ | पोलीस कोठडीतील मृत्यू | २२ |
| २ | पोलीस चकमकीतील मृत्यू | ०८ |
| ३ | तुरुंगातील मृत्यू | ११३ |
| ४ | बालगृहातील मृत्यू | ७६ |
| ५ | मतिमंद मुलांचे बालगृहातील मृत्यू | १३ |
| ६ | भिक्षेकरी गृहातील मृत्यू | ५७ |
| ७ | महिला गृहातील मृत्यू | ११ |

**तक्रारींचे विश्लेषण :**

३.१० आयोगाने यावर्षी १२७४ प्रकरणे निकाली काढली, त्यापैकी १०८७ प्रकरणे प्रथमदर्शनी निकाली काढली. १८७ प्रकरणे मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ चे कलम १७ (१)(ब) खाली संबंधित प्राधिकरणांकडून अहवाल प्राप्त करून व सुनावणी घेऊन बंद केली. १४ प्रकरणात आयोगाने शिफारशी केल्या.

# प्रकरण - ४

**अटक उप समितीचे अधिकार :**

४.१ भारताची राज्यघटना भारतीय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा उगम व आधार आहे. ती मूलभूत मानवी मूल्यांना संरक्षण देते. स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व या जागतिक मूल्यांचा जी संपूर्ण विश्वातील आधुनिक लोकशाही संस्कृतीचे आधारस्तंभ आहेत यांचा विजय आहे.

कलम २१ मध्ये गर्भित असलेले जीवनाचा व स्वातंत्र्याचा अधिकार दिले आहेत. ते स्पष्ट करतात की, 'कोणाही व्यक्तीस त्याच्या आयुष्यापासून किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून विधी नियम व पद्धतीशिवाय वंचित केले जाणार नाही. विधी नियम व पद्धतीशिवाय शासकीय सत्ता /शासकीय अधिकारी नागरिकांना त्याच्या जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित करू शकत नाही.

घटना हमी देते की जीविताचा हक्क व वैयक्तिक स्वातंत्र्य यामध्ये मानवी दर्जा व सन्मान याचा समावेश आहे. तसेच त्या सार्वभौम सत्तेकडून बेकायदेशीर स्थानबद्धता होणार नाही याची हमी समाविष्ट आहे.

४.२ संविधानीक सुरक्षेनुसार कित्येक वैधानिक तरतुदी मानवी स्वातंत्र्य, मानवी दर्जा व मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी केलेल्या आहेत. घटनेच्या कलम २२ मध्ये दिसून येणारी " अटक " ही संज्ञा व्यापक आहे. त्या संज्ञेत ज्या प्रकरणात एखाद्या व्यक्तीला अटक दिवाणी किंवा फौजदारी कोर्टात किंवा कोर्टाच्या आदेशाने अटक करण्यात येते फक्त अश्याच प्रकरणांना ती मर्यादित नाही. त्यामध्ये फक्त दंडात्मक आणि प्रतिबंधात्मक अटकेचा समावेश होतो असे नाहीं, तर ज्या प्रकरणाबाबत ज्यांना सोयिस्कररित्या संरक्षणात्मक अटक म्हणून म्हणतात याचाही समावेश होतो.

४.३ फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ लिखित स्वरुपात करण्याचा मुख्य उद्देश आरोपीला निःपक्ष व जलद गतीनै खटला चालवणे हा होता.

४.४ जरी तेथे कायदेशीर तरतुदी आणि मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय आणि राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आणि आंतरराष्ट्रीय करारात दिलेली मार्गदर्शक तत्त्वे असली तरीही पोलिसी छळाच्या थर्ड डिग्री पद्धती, कोठडीतील हिंसाचार, बेकायदेशीर स्थानबद्धता इत्यादी बाबतच्या तक्रारीत वाढ होत आहे, त्यामुळे, कोठडीतील हिंसेवर अंकुश ठेवण्यासाठी व अटकेत असणाऱ्या व्यक्तीच्या हक्कांच्या संरक्षणासाठी, माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत की, 'राज्यशासनाची कृती मात्र खरी, उचित व निःपक्ष असलीच पाहिजे. कुठल्याही प्रकारची माहिती काढण्यासाठी, कुठल्याही प्रकारचा छळ करणे योग्य किंवा उचित व निःपक्ष नसेल'.

४.५ माननीय सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत जीवनाचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क व मानवी दर्जा व मूल्यांचे संरक्षण करण्याच्या हेतुने डी.के.बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (१९९७) एस.सी.सी. या सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामध्ये ११ मार्गदर्शक तत्त्व निर्देशित केले आहेत. ते व्यक्तीला अटक करतेवेळी पाळणे जरुरी आहे व पुढे आदेश दिला की, त्यांचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी खात्यातील कार्यवाहीलाच जबाबदार नसेल तर कोर्टाच्या अवमानासाठी सुद्धा शिक्षेस पात्र असेल. ती कार्यवाही कोणत्याही कोर्टाने सुरू केली जाऊ शकेल.

४.६ कित्येक प्रकरणांमध्ये माननीय न्यायालयांच्या आदेशाचे उल्लंघन होत आहे म्हणून माननीय सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासन व सर्व राज्य शासनास दिनांक १९ ऑक्टोबर २००१ नुसार सी.आर.एल.एम.पी.नं. ४२१०/१९९७, ४१०५/१९९९, २६६० व २६०१/२०००, ४८०/२००१ व १२७०४/२००१ रिट पिटिशन (क्रिमिनल) नं. ५३९/१९८६ व ५९२/१९८७ मध्ये राज्य मानवी हक्क आयोगास पुढे असे निर्देश दिलेले आहेत की, उपसमित्या स्थापन करून व्यक्तीच्या अटक विषयी ११ मार्गदर्शक तत्त्वांचे पालन पोलीस, कस्टम, वनविभाग इत्यादी चौकशी करणाऱ्या यंत्रणेकडून पालन केले जाते काय याच्यावर देखरेख ठेऊन पालन करून घ्यावे. या मार्गदर्शक तत्त्वांचे पाठीमागे एकच हेतू आहे की, कोठडीतील हिंसा, छळ व अत्याचार यांच्यावर नियंत्रण आणणे आणि अधिकाऱ्यावर जबाबदारी टाकता यावी.

४.७ त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने उप समितीची स्थापना दिनांक २८ मार्च २०१४ रोजी केली. त्या समितीत मा. अध्यक्ष आणि मा. सदस्यांचा समावेश आहे.

**उप समितीची रचना :**

४.८ उप समितीचे मा. सदस्य खालीलप्रमाणे :

१. मा. न्यायमूर्ती श्री. एस.आर. बन्नूरमठ : उप समिती अध्यक्ष.

२. मा. श्री. भगवंतराव डी. मोरे : उप समिती सदस्य.

(शा.म.मु.) वाय २१९०- ४(१,०००-१-२०१५)

**संबंधित शासन यंत्रणेकडून प्रतिसाद :**

४.९ सर्व पोलीस अधीक्षकांकडून मा. आयोगास त्रैमासिक अहवाल प्राप्त झाले.

४.१० मा. आयोगातर्फे दिलेल्या भेटी, बैठका आणि जनजागृती कार्यक्रम.

**वर्ष २०१३ -१४ मध्ये आयोगाने खालील प्रकारच्या बैठका, कार्यक्रम आणि पोलीस स्टेशन /तुरुंग, आणि संस्थांना भेट दिल्या.**

| अ.क्र. (१) | पोलीस स्टेशन /तुरुंग /संस्था (२) | जिल्हा (३) | भेटीची तारीख (४) | मा. अध्यक्ष/ मा. सदस्य (५) |
|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे मा. अध्यक्ष आणि मा. सदस्य यांचेसोबत बैठक आणि चर्चा. | दिल्ली | २१ ऑक्टोबर २०१३ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| २ | महाराष्ट्रातील मानवी हक्क क्षेत्रात कार्य करणाऱ्या काही अशासकीय संस्थांशी चर्चा. | मुंबई | १५ डिसेंबर २०१३ | मा.न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| ३ | विभागीय आदिवासी विकास आयुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस महासंचालक (नाशिक विभाग), पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त, (सीईओ, जिल्हा परिषद), जिल्हा सामाजिक न्याय अधिकारी विभाग. | नाशिक | २१ डिसेंबर २०१३ | मा.न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| ४ | शासकीय कनिष्ठ आणि वरिष्ठ बालगृह (ज्यूवेनाइल) मुलींचे, नासर्डी. | नाशिक | २१ डिसेंबर २०१३ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| ५ | मुंबई विद्यापिठास भेट देऊन विद्यार्थ्यांमध्ये मानवी हक्काची जाणीव निर्माण करण्यासाठी कार्यक्रम. | मुंबई | ६ जानेवारी २०१४ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| ६ | अडवाणी लॉ कॉलेज येथे भेट देऊन विद्यार्थ्यांमध्ये मानवी हक्क विषयक जाणीव निर्माण करण्यासाठी कार्यक्रम. | मुंबई | ७ फेब्रुवारी २०१४ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| ७ | मिठीबाई कॉलेज येथे भेट देऊन विद्यार्थ्यांमध्ये मानवी हक्क विषयक जाणीव निर्माण करण्यासाठी कार्यक्रम. | मुंबई | ९ फेब्रुवारी २०१४ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| ८ | महिला व बालकल्याण विभाग, पुणे येथील अधिकाऱ्यांसोबत बैठक. | पुणे | १० मार्च २०१४ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |
| ९ | अनाथ मुलांसाठी कार्य करणारी अशासकीय संस्था सोफोश येथे भेट. अनाथ मुलांसाठी कार्य करणारी अशासकीय संस्था केअर (पॅलटीव केअर) येथे भेट. शिवाजी नगर बालनिरीक्षण गृह येथे भेट. | पुणे | ११ मार्च २०१४ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांचे सोबत बैठक आणि चर्चा. | दिल्ली | २१ ऑक्टोबर २०१३ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष |
| ११ | मानवी हक्क क्षेत्रात कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील काही अशासकीय संस्थांसोबत चर्चा. | मुंबई | १५ डिसेंबर २०१३ | मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ, अध्यक्ष |
| १२ | विभागिय आदिवासी विकास आयूक्त, पोलीस आयूक्त, पोलीस महासंचालक (नाशिक विभाग), पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयूक्त, (सीईओ, जिल्हा परिषद), जिल्हा सामाजिक न्याय अधिकारी विभाग. शासकिय कनिष्ठ आणि वरिष्ठ बालगृह (ज्यूवेनाइल)मुलींचे, नासर्डी, मुलींचे विशेष गृह नाशिक आणि जिल्हा परिवेक्षण अधिकारी यांच्यासी भेट. | नाशिक | २१ डिसेंबर २०१३ | मा. श्री. भगवंतराव डी. मोरे, सदस्य |
| १३ | भारती विद्यापिठ येथे आंतरराष्ट्रीय मुट कोर्ट कार्यक्रमाचे उदघाटन. | पुणे | ९ मार्च २०१४ | मा. श्री. भगवंतराव डी. मोरे, सदस्य |
| १४ | महिला बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांशी बैठक. | पुणे | १० मार्च २०१४ | मा. श्री. भगवंतराव डी. मोरे, सदस्य |
| १५ | अनाथ मुलांसाठी कार्य करणारी अशासकीय संस्था सोफोश येथे भेट. अनाथ मुलांसाठी कार्य करणारी अशासकीय संस्था केअर (पॅलॅटीव केअर)येथे भेट. शिवाजी नगर बालनिरिक्षण गृह येथे भेट. | पुणे | ११ मार्च २०१४ | मा. श्री. भगवंतराव डी. मोरे, सदस्य |

## प्रकरण - ५

**मानवी हक्कांचे संवर्धन :**

**मानवी हक्क दिन - १० डिसेंबर २०१३**

५.१ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी मानवी हक्क दिवस १० डिसेंबर २०१३ रोजी विधीक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी, अशासकीय संस्था आणि प्रसार माध्यमांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत एक दिवसाचे चर्चासत्र सह्याद्री शासकीय विश्रामगृह, मुंबई येथे आयोजित केले होते.

महाराष्ट्राचे राज्यपाल माननिय श्री. के. शंकरनारायणन यांनी या कार्यक्रमाचे उदघाटन केले. याप्रसंगी डॉ. नेल्सन मंडेला यांच्या दुःखद निधनाबद्दल त्यांचे प्रती आदर म्हणून दोन मिनिटांकरिता श्रद्धांजली वाहण्यात आली.

माननीय अध्यक्ष, न्यायमुर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ यांनी आपल्या स्वागतपर भाषणातून मानवी हक्कांचे महत्त्व विषद केले आणि प्रसार माध्यमे तसेच प्रशासकीय संस्था यांना आयोगाच्या या प्रयत्नात सहकार्य करण्याविषयी आवाहन केले.

माननीय सदस्य श्री. भगवंतराव डी. मोरे यांनी आमंत्रीतांचे आभार प्रदर्शन केले.

माननीय राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन यांनी दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले आणि मानवी हक्कांविषयी त्यांचा समज सांगितला आणि त्यांनी विशेषतः वरिष्ठ नागरिकांचे हक्कांविषयी संरक्षण आणि काळजी घेण्याची आवश्यकता यावर भर दिला.

कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रात, १. श्रीमती फातीमा लिलानी, प्रकल्प संचालक, वैद्यकीय निगा, सोसायटी पूणे. २. श्रीमती शैलू श्रीनिवासन, अध्यक्ष, डिग्नीटी फाउंडेशन, मुंबई. ३. प्रोफेसर श्री. अरविंद तिवारी, मानवी हक्क शिक्षण, संवर्धन, टाटा सामाजिकशास्त्र संस्था, मुंबई. ४. श्रीमती वंदना कृष्णा, अध्यक्षा, महाराष्ट्र आहार योजना आणि ५. डॉ. अनिता पाटील-देशमुख, पूकार - शहरी ज्ञान कृती आणि संशोधन यांनी आपले लेख सादर केले आणि त्यावर प्रोफेसर जी. हरगोपाळ यांनी संवादात्मक चर्चा केली आणि अस्तित्वात असलेले मानवी हक्क आणि उदयोन्मुख मानवी हक्क या वेगवेगळया मुद्द्यांवर चर्चा केली.

प्रकरण - ६

**प्रशासकीय बाब आणि साधनसामग्री पुरवठा :**

**प्रशासकीय व न्यायीक सहाय :-**

महाराष्ट्र शासनाने जी.आर.नं. एच.आर.सी. १०९९/३७८/पोल. १४, तारीख १५ जानेवारी २००० द्वारे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग स्थापन केला.

आयोग, ६ मार्च २००१ रोजी कार्यरत झाला. आयोगामध्ये अध्यक्ष आणि न्यायीक सदस्य आणि सदस्य ज्यांना मानवी हक्कांचे ज्ञान / व्यवहारीक ज्ञान आणि त्यासंबंधी बाबींचा अनुभव असलेल्यांचा समावेश होतो.

**कर्मचारी :**

६.१ आयोगाचा कर्मचारीवर्ग तीन ब्रिभागात विभागला गेला आहे. जसे प्रशासकीय विभाग, अन्वेषण विभाग ज्यांचे प्रमुख विशेष पोलीस महानिरीक्षक आहेत, विधी विभाग ज्यांचे प्रमुख प्रबंधक (दिवाणी न्यायाधीश). सचिव हे आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

**आवार :**

६.२ महाराष्ट्र शासनाने जी.आर.नं. एच.आर.सी. १०९९/३७८/पोल. १४, तारीख १५ जानेवारी २००० नुसार, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय, मुंबई येथे असेल असे नमूद केले. सद्यःस्थितीत आयोग हा ९, हजारीमल सोमाणी मार्ग, मुंबई येथे कार्यरत आहे. ही जागा छ.शि.ट. रेल्वे स्थानकाच्या जवळ असून ते येण्यास सोपे आहे विशेषतः महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून येणाऱ्या लोकांसाठी ते सोईस्कर आहे.

**साधने:**

६.३ वर्ष २०१३ -१४ या काळात महाराष्ट्र सरकारने रुपये ३ करोड १० लाख २७ हजार आयोगास दिले. त्यापैकी रुपये २ करोड २८ लाख ८६ हजार एवढा खर्च हा वेतन व इतर खर्च झाला. उर्वरित रक्कम महाराष्ट्र शासनास परत करण्यात आली.

## प्रकरण - ७

### आयोगाने निर्णय दिलेली उदाहरणात्मक प्रकरणे :

१ प्रकरण नं. २१७ / २०११ -१२

**तक्रारप्राप्त तारीख :** २१ मार्च २०११

**तक्रारदार :** मुकूंद जे. देशमुख आणि इतर

**प्रतिवादी :** पोलीस आयुक्त अमरावती.

**तक्रारीचे स्वरुप :**

सदरची तक्रार ही पूसद तालुका, जिल्हा- अमरावती येथील २७ रहिवाश्यांचे वलगाव पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या मानवी हक्क भंगासंदर्भातील आहे. दिनांक २५ एप्रिल २०१० रोजी गावात ग्रामपंचायतीची निवडणूक होती. तक्रारदारांपैकी एक तक्रारदार, पंकज दिनकरराव देशमुख, मतदान केंद्राच्या बाहेर आले असता, कोणतेही कारण नसताना दोन पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना मारहाण केली. इतर उपस्थित व्यक्तिंनी त्यांना मारहाणीचे कारण विचारले असता त्यांनाही पोलीस कर्मचाऱ्यांनी मारहाण करून जखमी करण्यात आले. तक्रारीत पुढे असे म्हटले की तक्रारदारांना अटक करून वलगाव पोलीस स्टेशन येथे नेण्यात आले. आणि इतरांना दुसऱ्या पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले कारण तक्रारदारांची संख्या जास्त होती. पुढे तक्रारदार असे म्हणतात की पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांना केले नाही तर अन्न सुद्धा मिळू दिले नाही अशाप्रकारे पोलीसांनी डी.के.बसू विरुद्ध स्टेट ऑफ वेस्ट बंगाल या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा भंग केला. आणि तक्रारदारांच्या मानवी हक्कांचा भंग केला.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. आयोगाने दिनांक २१ ऑक्टोबर २०१३ रोजी पोलीस आयुक्त, अमरावती यांचेकडून अहवाल मागविला. आयोगाच्या नोटीशीला प्रतिसाद म्हणून पोलीस आयुक्त अमरावती यांनी तपशीलवार अहवाल सादर करून त्यात तक्रारदारांचे आरोप हे खोटे आहेत असे म्हणून पोलिसांनी तक्रारदारांच्या मानवी हक्कांचा भंग केला नाही तसेच डी.के. बसू प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांचे काळजीपूर्वक पालन केले आहे असे म्हटले. तक्रारदारांचे अटकेपूर्वी किंवा अटकेनंतरच्या जखमांबद्दल असे म्हटले की, २५ एप्रिल २०१० रोजी ग्रामपंचायतच्या निवडणुकांमध्ये तक्रारदार नं. १ हा निवडणूक लढवित होता त्यावेळी तक्रारदार आणि त्याचे लोकांनी पोलिसांशी वाद करून त्यांचेवर दगडफेक केली. त्यावर पोलिसांनी प्रतिक्रिया म्हणून सौम्य कारवाई आणि अटक केली. आणि त्यामुळे काही तक्रारदारांना ज़खमा झाल्या. सारांशात असे म्हटले आहे की संबंधीत पोलिसांनी कायद्याच्या मर्यादेत राहून कृती केली आणि डी.के.बसू प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले म्हणून सदर तक्रार ही खारीज करण्यात यावी. मा. आयोगाने श्री. मुकुंद देशमुख तक्रारदार नं.१ आणि श्री. शिरीष डी. राठोड उपस्थित असलेले पोलीस निरीक्षक वलगाव पोलीस स्टेशन यांना एकून घेतले आणि दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

**आयोगाचा निर्णयः**

मा. आयोगाने असे मत दिले की, सदर प्रकरणात संबंधीत पोलीस हे तक्रारदारांच्या तक्रारींची नोंद करण्यात अपयशी ठरले असून पोलिसांचा दृष्टीकोन पूर्वगृह दृषित होता आणि अन्यायग्रस्तांना न्याय नाकारण्यात आल्याने खालील प्रकारची शिफारशी केल्या.

(अ) राज्य सरकारने पोलीस अधिकाऱ्यांमध्ये जागृती व शिक्षण निर्माण करून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंदणी करावी आणि शिक्षापात्र गुन्हे असल्यास अथवा तपासानंतर शिक्षापात्र असण्याची शक्यता असल्यास त्याचा तपास करावा, पोलिसांनी तक्रारीचि लिहून न घेणे हा मानवी हक्कांचा भंग आहे. त्यामुळे हे फौजदारी न्यायपद्धतीत जाण्याचे मूळ आहे.

(ब) प्रस्तुत प्रकरणामध्ये आयोगाच्या असे लक्षात येते की, काही तक्रारदारांना गुन्हा नोंदविण्याचा उद्देश होता परंतु पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हा न नोंदवून तक्रारदारांचे योग्य न्याय मिळविण्याचे मार्ग बंद केले, यास्तव आयोग प्रत्येक तक्रारदाराला रुपये दहा हजार राज्य शासनाने नुकसान भरपाई म्हणून देण्याचे निर्देशीत करीत असून या आदेशाची पूर्तता अहवाल हा आदेश प्राप्त झाल्यानंतर चार आठवड्याच्या आत करावी.

२ प्रकरण क्र. १४०५/२०११-१२

तक्रारप्राप्त तारीख : २७ मे २०११

तक्रारदार : दत्तात्रय बी. सांगळे

प्रतिवादी : पोलीस अधीक्षक, जिल्हा बीड.

तक्रारीचे स्वरुप :

तक्रारदार, श्री. दत्तात्रय बी. सांगळे यांना, पोलीस अधिकारी, श्री. धनराज सदाशिव गव्हाणे, सहा. पोलीस निरीक्षक, अंमलनेर पोलीस स्टेशन यांनी बेकायदेशीररित्या अटक केली, डांबून ठेवले आणि गैरवर्तन केले अशी तक्रार केली. पुढे असे म्हटले आहे की, १० मे २०११ रोजी तक्रारदार हे आपल्या मोटार सायकलने पेट्रोल पंपाजवळून जात असताना सहा. पोलीस निरीक्षक यांनी थांबविले आणि तक्रारदारांना घाणेरड्या शब्दात शिवीगाळ करू लागले. तक्रारदाराने त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला असता सहा. पोलीस निरीक्षक यांनी जोरात शिविगाळ करण्यास सुरुवात केली. पोलिसांशी वाद करतो म्हणून तुला धडा शिकवावा लागेल, बेकायदेशीररित्या तक्रारदाराला अटक करून त्यांचेवर दारु पिऊन वाहन चालविण्याचा गुन्हा नोंदवून त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी बाध्य केले.

आयोगाने केलेली कारवाई :

आयोगाने पोलीस अधीक्षक, जिल्हा बीड यांचेकडून अहवाल मागितला. अहवाल प्राप्त झाल्यानंतर आणि तपशीलवार चौकशी केल्यानंतर आयोगाचे मत झाले की, संबंधीत पोलिसांनी निवृत्त शिक्षकाला बेकायदेशीर अटक केले आणि डांबून ठेवले आणि त्याचेविरुद्ध खोटा फौजदारी गुन्हा नोंदवून डी.के.बसू प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजाणी करण्यास अपयशी ठरले.

आयोगाचा निर्णय :

मा. आयोगाने पुढील शिफारस केली :

(अ) राज्य सरकार आणि गृह मंत्रालय,मुंबई यांनी पोलीस विभागाला योग्य मार्गदर्शक तत्त्वे आदेशित करावीत. विशेषतः मा. सर्वोच्च न्यायालयाने डी.के. बसू प्रकरणात आणि इतर प्रकरणात दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुशंगाने करावेत,व त्यांचे कठोर पालन करावे, ज्यामुळे याप्रकरणात केलेल्या बेकायदेशीर अटक आणि खोट्या प्रकरणात अडकविण्यासारख्या घटनांना प्रतिबंध होईल.

(ब) सहायक पोलीस निरीक्षकाने केलेल्या बेकायदेशीर अटक आणि खोट्या गुन्ह्यांमुळे एका निवृत्त शिक्षकाचे जो वरिष्ठ नागरिक आहे त्याच्या मानवी हक्कांचा भंग झालेला आहे. आयोग राज्य सरकारला असे निर्देश देतो की, त्यांनी तक्रारदाराला हा आदेश प्राप्त झाल्यापासून ६ आठवड्याच्या आत रुपये ५०,००० तत्काल नुकसान भरपाई म्हणून द्यावेत आणि त्याचा पूर्तता अहवाला आयोगास सादर करावा.

३ प्रकरण क्र. २१४३/२०१३-१४

तक्रारप्राप्त तारीख : २२ ऑक्टोबर २०१३

तक्रारदार : सूरेखा ए. गायकवाड

प्रतिवादी : पोलीस निरीक्षक, वाशी पोलीस स्टेशन, नवी मुंबई.

पोलीस निरीक्षक, विनोबा भावे पोलीस स्टेशन.

तक्रारीचे स्वरुप :

हे प्रकरण अत्यंत दुर्दैवी असून त्यात एका आईला स्वतःच्या हरवलेल्या मुलीचा शोध घेणेकरिता पोलिसांच्या निष्क्रीयतेमुळे चहूदिशांना धावावे लागले आणि अंतिमतः आयोगात यावे लागले. या तक्रारीनुसार तक्रारदाराची काजोल अनंत गायकवाड नावाची २१ वर्षाची मुलगी दिनांक १५ ऑगस्ट २०१३ या तारखेपासून घरातून हरवल्यावर तक्रारदाराने तिचा नातेवाईकांसोबत सर्वत्र शोध घेतल्यानंतर विनोबा भावे पोलीस स्टेशन, कूर्ला (प.) मुंबई येथे हरविल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर तीला पोलिसांकडून काही माहिती कळली नाही. पुढे तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार तक्रारदारला ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात असे कळले की, तिच्या मुलीचे मृत शरीर हे वाशी पोलीस , नवी मुंबई यांना दिनांक १५ ऑगस्ट २०१३ रोजी मिळून आले. तिने स्वतः वारंवार विनंती करून सुद्धा तिला याबाबतीत कळविण्यात आले नाही, आणि अंतिमतः तीला असे

सांगण्यात आले की दिनांक १७ सप्टेंबर २०१३ रोजी पोलिसांनी मृत शरीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तक्रारदारच्या म्हणण्यानुसार पोलिसांच्या निष्क्रीयतेमुळे आई / तक्रारदार आणि तिचे नातेवाईक मृत शरीरावरती अंत्यसंस्कार करू शकले तर नाहीत परंतु मृत शरीर पाहू सुद्धा शकले नाहीत आणि यामुळे त्यांना अत्यंत मानसिक दुःखाला सामोरे जावे लागून त्यामुळे त्यांच्या मानवी हक्कांचा भंग झालेला आहे.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. अध्यक्ष यांनी दिनांक २३ ऑक्टोबर २०१३ रोजीचे वृत्तपत्रातील बातमीचे अवलोकन करून याप्रकरणी सुमोटो /स्वयंखुद्द दखल घेतली आणि पोलीस आयुक्त नवी मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाशी पोलीस स्टेशन, पोलीस उपायुक्त परिमंडळ ५ मुंबई आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनोबा भावे पोलीस स्टेशन, कुर्ला मुंबई यांना नोटीस पाठविली. तक्रारदाराला एकून घेतले, श्री. सुगावकर सहायक पोलीस निरीक्षक, वाशी पोलीस स्टेशन आणि श्री. व्ही. के. उकरंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विनोबा भावे पोलीस स्टेशन यांचे म्हणणे एकून आणि उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करुन, आयोगाचे असे मत झाले की, संबंधीत पोलिसांनी तक्रारदाराच्या मुलीच्या मृत शरीराच्या ओळखीबाबत पुरेसे आणि योग्य ते पावले उचलली नाहीत आणि हरविलेल्या व्यक्तिचा तपास करण्याबाबत अपयशी ठरून सापडलेल्या मृत शरीराची ओळख करण्याबाबत निष्क्रीयता दाखविली.

**आयोगाचा निर्णय :**

मा. अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आदेश पारित केले:

जेव्हा पोलिसांना अनोळखी मृत शरीर सापडले, त्यावेळी आपल्या शेजारच्या पोलीस स्टेशनाशी हरवलेल्या व्यक्तिंबाबत तक्रारींची शहानिशा करतानाच नियंत्रण कक्षाशी देखील संपर्क करावा आणि ओळख पटवावी. संबंधींनी पोलीस अधिकाऱ्यांमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रात याबाबत सूचना द्याव्यात आणि जागृती निर्माण करून हरवलेल्या व्यक्तिचा शोध घेण्यासाठी आणि अनोळखी मृत शरीराच्या ओळख पटविण्यासाठी योग्य ती पद्धत अंमलात आणावी.

परंपरेनुसार एक आई तिच्या नातेवाईकांना अंतिमवेळी आपल्या मुलीचा चेहरा पाहावयास मिळाला नाही तसेच मृत शरीरावर अंत्यसंस्कार करता आले नाही आणि त्यांना त्यामुळे दुःख, मनःस्ताप हा पोलिसांच्या निष्क्रीयतेमुळे झाल्यामुळे तत्कालीक नुकसान भरपाई म्हणून रुपये १,००,००० (रुपये एक लाख फक्त) आईला द्यावेत.

या आदेशाची पूर्तता विशेषतः नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबतचा अहवाल हे आदेश प्राप्त झाल्यानंतर सहा आठवडयात आयोगास सादर करावा, या निरीक्षणानुसार सदरचे प्रकरण बंद केले.

**४. प्रकरण क्र. २३४४/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** ३० जूलै २०११

**तक्रारदार :** विकास काचूर अहिवले

**प्रतिवादी :** पोलीस अधीक्षक, जिल्हा सातारा

**तक्रारीचे स्वरुप :**

सदरचे प्रकरण हे श्री. विकास अहिवले, अध्यक्ष, फलटण प्रेस क्लब, जिल्हा सातारा यांनी केलेली असून ती पोलिसांनी दिनांक २४ एप्रिल २०११ रोजी फलटणमध्ये केलेल्या बेकायदेशीर कृत्याबद्दल आहे. तक्रारीनुसार दिनांक २६ एप्रिल २०११ रोजी दंगल झाली होती. संबंधीत पोलीस आणि पाच अधिकाऱ्यांनी कलम १४४ लागू असताना घरांमध्ये प्रवेश केला आणि विद्यार्थी, जनता आणि स्त्रियांवर मारहाण करून १०० पेक्षा अधिक लोकांना अटक केली. तक्रारीत पुढे असे कथन केले की, यासंदर्भात दिनांक २९ एप्रिल २०११ रोजी तक्रारदारांनासुद्धा वर उल्लेखलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी अटक करण्यात आली आणि निर्दयपणे मारहाण करण्यात आली. तक्रारीत विनंती करण्यात आली की, पोलिसांनी जनतेविरुद्ध केलेल्या बेकायदेशीर कृत्याबद्दल यांचे विरोधात कारवाई केली जावी.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. आयोगाने दिनांक २३ नोव्हेंबर २०१३ रोजी पोलीस अधीक्षक, जिल्हा सातारा यांना नोटीस पाठविली. त्यावर पोलिसांकडून कोणताही व्यक्ति हजर राहिला नाही आणि मा. आयोगास प्रतिसाद न मिळाल्यामुळे पोलीस अधीक्षकांना नोटीस काढण्यात आली आणि त्यांचेकडून आयोगाला प्रतिसाद न देण्याच्या पोलिसांच्या प्रवृत्तीबद्दल खुलासा मागविण्यात आला. तक्रारीच्या अनुशंगाने जिल्हा पोलीस प्रमुखांकडून अहवाल मागविण्यात आला आणि संबंधीत पोलीस आणि जिल्हा पोलीस, पोलीस प्रमुख यांनी आयोगाकडे तपशीलवार अहवाल सादर केला. अहवालात असे म्हटले की, दिनांक २६ एप्रिल २०११ रोजी सोमवार पेठ आणि मंगळवार पेठ विभागातील दोन गटांमध्ये आपसात मारामारी सुरू होती आणि शर्तीचे प्रयत्न करून सुद्धा दंगल शमत नसल्यामुळे तेथे, २८ एप्रिल २०११ रोजी कडक उपाय योजना म्हणून कर्फ्यूचे आदेश देण्यात आले आणि त्यासंदर्भात १११

व्यक्तिंना अटक करण्यात आली. चौकशीच्या काळात पोलीस अधिक्षकांनी संबंधीत तक्रारदारांचे जबाब आणि संबंधीत पोलिसांचे जबाब नोंदवून घेतले. चौकशीअंती जिल्हा पोलीस प्रमुखांना असे आढळले की, कुठल्याही पोलीस अधिकाऱ्यांने कोणत्याही तक्रारदारास अटक केली नाही किंवा मारहाण केली नाही, प्रस्तूत तक्रार तक्रारदाराचे नातेवाईकांना अटक झाल्यामुळे त्याचा सूड म्हणून तक्रारदाराने दाखल केलेली आहे.

**आयोगाचा निर्णय :**

मा. अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :–

कोणत्याही व्यक्तीला अटक करताना किंवा ताब्यात घेताना मा. सर्वोच्च न्यायालयाने डी.के. बसू प्रकरणात दिलेली मार्गदर्शक तत्त्वे तसेच राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार योग्य ती काळजी व सावधगीरी बाळगण्याची सूचना राज्य सरकारने पोलीस यंत्रणेला द्यावी व त्याचे कडक पालन करण्यास सांगावे.

गृह विभागाने सर्व पोलीस अधिकाऱ्यांना मानवी हक्क आयोगाने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने चौकशी करीत असताना पुराव्यांमध्ये योग्यरितीने आणि स्वतंत्ररित्या पहावे आणि केवळ यांत्रिकपणे अहवाल सादर न करता स्वत:च्या बुद्धीचा वापर करावा. तसेच या पोलीस अधिकाऱ्यांना हे सुद्धा निर्देशित करावे की त्यांनी जे स्वतंत्र साक्षीदार तक्रारदारांच्या बाजूने किंवा विरोधात बयान देतील त्यांची सुद्धा साक्ष नोंदवावी. केवळ उपचार म्हणून काही पोलीस अधिकाऱ्यांचे आणि तक्रारदारांचे साक्ष नोंदवू नये.

समोर आलेला नाकारता न येण्याजोगा पूरावा आणि तक्रारदारांच्या इजा जरी साध्या असल्यातरी आयोग हे तक्रारदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १५,००० देण्याची आदेशीत करीत असून हे आदेश प्राप्त होताच चार आठवड्यांच्या आत त्याचा पूर्तता अहवाल आयोगास पाठविण्यात यावा.

**५. प्रकरण क्र. २८२७/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** १४ सप्टेंबर २०११

**तक्रारदार :** जी. आर. कामत आणि इतर

**प्रतिवादी :** पोलीस उपायुक्त, परिमंडळ १०, मुंबई
वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अंधेरी पोलीस स्टेशन, मुंबई

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारीत म्हटले आहे की, तक्रारदार ज्यापैकी अनेकजण वरिष्ठ नागरीक असून अंधेरी जिमखान्याचे सदस्य असून हा जिमखाना मुंबई सार्वजनिक न्यास आणि सोसायटी नोंदणी कायद्यानुसार नोंद झालेली संस्था असून गेल्या २५ वर्षांपासून अस्तित्वात आहे. तक्रारीत असे म्हटले आहे की, सदस्य हे नियमीतरित्या जिमखान्याला भेट देत असून तेथे जोड आणि रम्मी सारखे पत्त्यांचे खेळ खेळतात. तक्रारीत असे म्हटले की दि. १० ऑगस्ट २०११ रोजी हे सदस्य जिमख्यान्यात उपस्थित असतांना उल्लेखीत पोलीस अधिकाऱ्यांनी सायंकाळी ८-१५ वाजता धाड मारुन सदस्य यांना जुगार खेळण्याच्या कृत्याखाली अटक करून त्यांना अंधेरी पोलीस स्टेशनमध्ये नेऊन अमानवीय वर्तन केले म्हणून मानवी हक्कांचे भंगाविषयक सदर तक्रार आयोगापुढे सादर झाली.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. आयोगाने दि. १९ ऑक्टोबर २०१३ रोजी पोलीस उपायुक्त परिमंडळ १०, मुंबई यांना नोटीस पाठविली. अहवाल आणि उपलब्ध कागदपत्रे, तक्रार, इतर बाबी यांचे अवलोकन केले असता, प्रथमदर्शनी आयोगाचे असे मत झाले की, या प्रकरणात नामोल्लेख झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी केवळ कायद्याबद्दलच अनादर दाखविला नाही तर अटके संदर्भातील, ताब्यात घेण्यासंदर्भातील मुलभूत कार्यप्रणाली, नियम, प्रक्रीया यांचाही अनादर केला आणि नागरीकांचे मानवी हक्कांचा भंग केला.

**आयोगाचा निर्णय :**

मा. आयोगाने खालील प्रमाणे आदेश पारित केले :–

आयोग असे शिफारस करते की, राज्य शासनाने या प्रकरणात स्वत: लक्ष घालावे आणि याप्रकारे चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या विरोधात योग्य आणि पुरेशी शिक्षा द्यावी कारण त्यांनी फक्त कायदयाबद्दल अनादर दर्शविला नसून, नागरीकांना उपलब्ध असलेल्या मुलभूत हक्क आणि मानवी हक्कांविषयी अनादर दर्शविला आहे. राज्य सरकारला शिफारस करण्यात येते की, हा आदेश प्राप्त होताच चार महिन्यांच्या आत त्यांनी पुन्हा याबाबत कार्यवाही करावी आणि त्याबाबत न्यायालयाला तसेच आयोगाला अहवाल द्यावा.

**६. प्रकरण क्र. ३७५२/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** ८ नोव्हेंबर २०११

**तक्रारदार :** रेखा एस. पारेख

**प्रतिवादी :** सहायक पोलीस निरिक्षक, दहिसर पोलीस स्टेशन

**तक्रारीचे स्वरूप :**

सदरची तक्रार ही तक्रारदार श्रीमती रेखा एस. पारेख यांचा मुलगा अमित पारेख याला दहिसर पोलीस विषेशतः सहायक पोलीस निरिक्षक श्री. खाटे यांनी केलेल्या बेकायदेशीर अटक आणि मारहानी संदर्भातील आहे.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. आयोगाने दि. ५ ऑक्टोबर २०१३ रोजी पोलीस उपायुक्त परिमंडळ १२, मुंबई यांना समन्स पाठविले. पोलीस उपायुक्त परिमंडळ १२ यांनी या प्रकरणाची तपशीलवार चौकशी करून तक्रारदार आणि सहायक पोलीस निरिक्षक श्री. खाटे यांचे जबाब नोंदवून अहवाल सादर केला. या अहवालात असे म्हटले की, तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार अमित पारेख यांना बेकायदेशीर अटक झाली आणि सहा. पोलीस निरिक्षकाने तक्रारदारास अश्लिल शब्द वापरले हे आरोप सिद्ध होत नाहीत तसेच अमितला पोलिसांनी केलेल्या मारहाणीच्या संदर्भात कोणत्याही दवाखान्याकडून याबाबतचा वैद्यकीय अहवाल तक्रारदाराने किंवा अन्यायग्रस्त व्यक्तीने सादर न केल्यामुळे मारहाण झाली असे म्हणता येत नाही. तरीही, उपायुक्तांना असे आढळून आले की, सहायक पोलीस निरिक्षक यांनी अमित पारेख यांना ताब्यात घेताना आणि सोडताना करावयाच्या नोंदीबाबत कर्तव्यात कसूर केली असल्यामुळे त्यांना याबाबत 'सक्त ताकीद' देण्याची शिक्षा केलेली आहे.

**आयोगाचा निर्णय :**

मा. आयोगाने खालील प्रकारे आदेश केले :—

पोलीस अधिकाऱ्यांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने तसेच राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने बेकायदेशीर अटक / डांबणे आणि थर्ड डिग्री वागणूक देण्याविषयी प्रतिबंध याबाबत संवेदनशिलता निर्माण करण्याची आवश्यकता असून संबंधीत पोलिसांचे नियमितपणे योग्य प्रशिक्षण आणि जागृती करणे आवश्यक आहे.

संपूर्ण वस्तूस्थितीचा आणि सत्याचा अभ्यास केला असता असे आढळते की, अमित पारेख यांच्या शरीरावरील जखमा साध्या स्वरूपाच्या असून त्याबाबत कर्तव्यात कसून केल्याबद्दल संबंधीत सहायक पोलीस निरिक्षक श्री. खाटे यांची विभागीय चौकशी होऊन त्यांना सक्त ताकीदीची शिक्षा दिल्याने आयोग त्यांचे विरुद्ध पुढील कार्यवाही करत नाही.

तरीही, तक्रारदार यांचा मुलगा अमित पारेख याचे महत्त्वाचे मानवी हक्क भंग झाल्यामुळे राज्य सरकारने रुपये ५०,००० नुकसान भरपाई म्हणून अन्यायग्रस्त व्यक्ती अमित पारेख यांना हे आदेश प्राप्त झाल्यानंतर चार आठवड्याच्या आत अदा करुन त्याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करावा.

**७. प्रकरण क्र. ३८००/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** ९ नोव्हेंबर २०११

**तक्रारदार :** नंदिनी शिर्के

**प्रतिवादी :** पोलीस उपायुक्त परिमंडळ ३, मुंबई

**तक्रारीचे स्वरूप :**

आयोगास सादर करण्यात आलेल्या तक्रारीत तक्रारदार म्हणते की, दि. ७ फेब्रुवारी २०११ रोजी दुपारी १-३० वाजता आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे तिच्या पतीच्या विरोधात आणि श्रीमती नुतन चोप्रा यांचे सह तीन व्यक्तींच्या विरोधात तक्रारदारास राहत्या घरात मारहाण झाल्याबद्दल तक्रार देण्यासाठी गेली होती. परंतू तेथे कर्तव्यावर असलेल्या पोलीस निरिक्षक श्री. खरडे यांनी फक्त तक्रार घेण्यास नकार दिला नाही तर त्याहीपलीकडे जाऊन तक्रारदार आणि तीच्या किशोरवयीन मुलीला मध्यरात्रीपर्यंत डांबून ठेवले आणि त्यानंतर त्यांना घरी जाऊ दिले.

**आयोगाने केलेली कारवाई :**

यासंदर्भात संबंधीत पोलिसांना दिनांक ५ ऑक्टोबर २०१३ रोजी समन्स पाठविण्यात आले आणि याप्रकरणी पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ यांनी योग्य ती चौकशी करून दिनांक २३ फेब्रुवारी २०११ तारीख असलेला अहवाल सादर करून बेकायदेशीर अटक केल्याच्या आरोपांना नाकारले. याउलट अहवालत असे म्हटले की, तक्रारदार आणि तीच्या नवऱ्यात आणि श्रीमती. नुतन चोप्रा यांचेसह इतर व्यक्ती यांच्यात वाद विवाद होता. यासंदर्भात संबंधीत पोलीसांना अशी माहिती मिळाली की, तक्रारदार यांनी श्रीमती नुतन चोप्रा यांचेवरती हाताने मारहाण केली आणि घाणेरड्या भाषेत शिवीगाळ केली. श्री. खरडे यांनी श्रीमती नुतन चोप्रा यांना हॉस्पिटलमध्ये पाठविले आणि त्यानंतर तक्रारदार आणि तिच्या मुलीला पोलीस स्टेशनमध्ये आणले. श्रीमती नुतन चोप्रा या हॉस्पिटलमधून परत आल्या नाहीत म्हणून त्या हॉस्पिटल मधून परत येईपर्यंत तक्रारदार आणि तीच्या मुलीला पोलीस स्टेशनमध्ये थांबण्याची विनंती केली. रात्री १०-४५ वाजता श्रीमती नुतन चोप्रा परत आल्यानंतर सदरचे प्रकरण साधे भांडणाचे व अदखलपात्र गुन्हा असल्याने याबाबतीत गुन्हा क्र. २८८/११, गुन्हा कलम ५०४, ३२३ अशी नोंद घेऊन तक्रारदारांना शांतता राखण्याचे सांगून जाऊ दिले. पुढे असेही म्हटले आहे की, तक्रारदार ही भांडखोर स्वभावाची असून तिच्या विरोधात गुन्हा नं. २५४/१० अशी नोंद झालेली असून याबाबत आरोपपत्र दाखल झाले असून त्याची सुनावणी प्रलंबीत आहे. या अहवालाचा सारांश असा की, तक्रारदाराची बेकायदेशीररित्या अटक झालेली नाही आणि तिने आयोगात खोटी तक्रार दाखल केलेली आहे.

**आयोगाचा निर्णय :**

मा. आयोगाने खालील प्रमाणे आदेश केले आहेत :–

आयोगाने तपशीलवार चौकशी केली असता असे आढळते की, संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे / बचाव हा विश्वास न ठेवण्यासारखा / न स्वीकारण्यासारखा आहे. आयोगाचे हे मत आहे की, या प्रकरणात बेकायदेशीर डांबणे हा प्रकार झाला असून डी. के. बसू प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांचा भंग झालेला असून तक्रारदाराच्या मानवी हक्कांचा भंग झालेला आहे.

मानवी हक्क भंगाचे स्वरूप लक्षात घेता मा. अध्यक्ष हे राज्य सरकारला तक्रारदाराला रुपये २५,००० नुकसान भरपाई म्हणून सदर आदेश प्राप्त होताच चार आठवड्यात देऊन तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना अटक करतेवेळी पोलीस कर्मचाऱ्यांना बोलवण्यावेळी, अटक किंवा ताब्यात घेण्याच्यावेळी विशेषतः महिलांच्याबाबतीत योग्य ती कारवाई करण्याचे प्रशिक्षण द्यावे असे आदेश देत आहे.

**८. प्रकरण क्र. ४०२४/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** २२ नोव्हेंबर २०११

**तक्रारदार :** राजाराम एस. सोनवळकर

**प्रतिवादी :** पोलीस आयुक्त, नवी मुंबई

वरिष्ठ पोलीस निरिक्षक, खारघर पोलीस स्टेशन.

**तक्रारीचे स्वरूप :**

सदरची तक्रार ही श्री. राजाराम एस. सोनवळकर, सुरक्षा रक्षक, एटीएम आयडीबीआय बँक, खारघर, सेक्टर ७ येथे कर्तव्यावर असताना दि. २८ एप्रिल २०११ रोजी दोन पोलीस कर्मचारी त्यापैकी एक श्री. शिवाजी पाटील हेडकॉन्स्टेबल हे रात्री २ वाजता एटीएम येथे येऊन त्यांनी तक्रारदारास कर्तव्यावर असताना झोपला असा आरोप करून मारहाण केली. त्या मारहाणीमुळे तक्रारदाराचे शरीराचे हाडे स्नायु दुखावून गंभीर शारिरीक दुखापती झाल्या तसेच मानसिक धक्का बसल्याने तक्रारदाराने दोषी पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाईची मागणी केली.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. आयोगाने दि. २२ ऑक्टोबर २०१३ रोजी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना समन्स पाठविले. त्यास प्रतिसाद म्हणून श्री. एस.बी. सूर्यवंशी, उपायुक्त, पनवेल यांनी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचेवतीने तपशीलवार अहवाल सादर केला. तक्रारीतील आरोपाविषयी असे सांगण्यात आले की, दि. २८ एप्रिल २०११ रात्री २ वाजता संबंधीत हेडकॉन्स्टेबल श्री. पाटील आणि एक कर्मचारी रात्रीच्यावेळी गस्त घालीत असतांना त्यांना असे आढळले की, तक्रारदार जो एटीएमचा सुरक्षारक्षक आहे, तो झोपलेल्या अवस्थेत आढळला असता त्याने झोपू नये याउद्देशाने त्याला पोलिसांनी धावण्यास सांगीतले ज्यामुळे तो जागा राहून त्याचे कर्तव्य बजावू शकेल एवढाच त्यामागे उद्देश होता.

**आयोगाचा निर्णय :**

तपशीलवार चौकशी केल्यानंतर मा. अध्यक्ष यांनी खालील आदेश पारित केला :

तक्रारदार हा कोणत्याही गुन्हेगारी कृत्यात सामील नसल्याने त्याला केलेली अटक व मारहाण ही बेकायदेशीर असून मानवी हक्कांचा भंग आहे. राज्य सरकारने तक्रारदारास नुकसान भरपाई द्यायलाच हवी म्हणून तक्रारदारास नुकसान भरपाई म्हणून रुपये २५,००० सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर चार महिन्याच्या आत द्यावेत आणि त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पोलीस आयुक्त यांनी नव्याने विभागीय चौकशी करून योग्य ते आदेश करुन त्याबाबतचा पूर्तता अहवाल सहा आठवड्यात सादर करावा.

**९. प्रकरण क्र. ४०४९/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** १० डिसेंबर २०१२

**तक्रारदार :** निलकंठ जी. सोमकुवर

**प्रतिवादी :** जिल्हाधिकारी, नागपूर

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराने असे म्हटले आहे की, वर्ष २००३-०४ मध्ये तो दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती मानला जाऊन त्याला इंदिरा आवास योजनेमध्ये घर बांधण्यासाठी आरंभिक अनुदान रुपये ५०,००० प्राप्त झाल्याने त्याने घर बांधण्यास सुरुवात केली, त्यानंतर उर्वरीत रक्कम तक्रारदारास प्राप्त न झाल्याने त्याने सतत सरकारी अधिकाऱ्यांकडे विनंती केली असता त्याची विनंती मान्य न करता उलट शासकीय निर्णयाचा आधार आणि निकष आणि पात्रता आधार घेवून तक्रारदाराचे नाव दारिद्र्य रेषेखालील पात्र व्यक्तिच्या यादीमधून काढून टाकले. तक्रारदार असेही म्हणतो की, त्याचे नाव दारिद्र्य रेषेतील पात्र यादीतून वगळल्यानंतर, तक्रारदाराने दारिद्र्य रेषेखालील असल्याचा खोटा दावा केल्याबद्दल पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली. तक्रारदाराचे म्हणणे आहे की, हा संपूर्ण खटाटोप हा संबंधीत शासकीय अधिकाऱ्यांने तक्रारदाराचा छळ करण्याच्या उद्देशाने तसेच त्याचा कायदेशीर हक्क हिरावून घेण्याच्या उद्देशाने केला होता.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. आयोगाने दि. १९ नोव्हेंबर २०१३ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांना समन्स पाठविले. यासंदर्भात श्री. मकरंद नेटके, प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नागपूर हे मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद, नागपूर यांचे वतीने उपस्थित राहून त्यांनी कागदपत्रे आणि तपशीलवार अहवाल सादर करून दर्शविले की, कागदपत्रे आणि योग्य ती चौकशी केल्यानंतर त्यांना असे आढळले की तक्रारदार हा दारिद्र्य रेषेखालील पात्रता यादीत समावेश होण्यास अपात्र आहे आणि सदरची तक्रार केवळ अधिकाऱ्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने केली आहे.

**आयोगाचा निर्णय :**

चौकशी केली असता कागदपत्रांच्या अभावी आयोगास अन्यायग्रस्त व्यक्तिचे मानवी हक्क भंग आढळून आला नाही, तरी तक्रारदाराची समस्या विचारात घेऊन आयोगाने तहसिलदार यांना पुन्हा चौकशी करून तक्रारदारास संधी द्यावी असे म्हटले आणि सदर आदेश प्राप्त होताच तीन महिन्याच्या आत याबाबत आयोगास आणि तक्रारदारास कळवावे असे सांगीतले.

**१०. प्रकरण क्र. ४३३०/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** २७ डिसेंबर २०१२

**तक्रारदार :** मो. बिलाल अब्दूल सत्तार मेमन

**प्रतिवादी :** जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलढाणा

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदार नामे मो.बिलाल अब्दूल सत्तार मेमन तो फाटकपूरा, खामगाव, जि. बुलढाणा येथील रहिवाशी असून शिवाजी नगर पोलीस स्टेशन यांनी त्याला दिलेल्या बेकायदेशीर वर्तणूकीबद्दल तक्रार दिलेली आहे. यासंदर्भात तक्रारदाराची तक्रार अशी आहे की, तो सामाजिक कार्यकर्ता असून त्याने दि. ४ जुलै २०११ रोजी खामगाव परिसरात दारू, गांजा सारख्या पदार्थांची विक्रीबद्दलच्या बेकायदेशीर कृत्यांबद्दल संबंधीत पोलिसांच्या निर्देशनास

आणले. तक्रारीत असेही म्हटले आहे की, दिनांक २२ ऑगस्ट २०११ रोजी पोलीस कॉन्स्टेबल यांनी तक्रारदारांना नोटीस बजावून दुसऱ्या दिवशी त्यांची दिनांक ४ जुलै २०११ रोजीच्या तक्रारीबद्दल चौकशीसाठी हजर राहण्यासाठी कळविले. पुढे तक्रारदार असे म्हणतात की त्यादिवशी २२ ऑगस्टच्या मध्यरात्री २ वाजता दोन पोलीस कॉन्स्टेबलांच्या सोबत पोलीस निरिक्षक श्री. सुर्यवंशी आणि पोलीस उप निरिक्षक श्री. राजू पवार यांनी तक्रारदाराच्या घरात प्रवेश करून तक्रारदारास त्याने बेकायदेशीर गांजा आणि दारु विक्रीबद्दल पोलिसांच्या निष्क्रीयतेबद्दल तक्रार केल्याबद्दल शिवीगाळ केले. तसेच पोलिसांनी जबरदस्तीने कोऱ्या कागदावरती त्याच्या सह्या घेतल्या यामुळे तक्रारदारास स्वतःच्या सुरक्षतेविषयी चिंता वाटत असून त्याला खोट्या प्रकरणात अडकविले जाण्याची शक्यता आहे. तो अशीही तक्रार करतो की, कुठलेही सबल कारण नसताना त्याचे नाव पोलिसांनी गुंडांच्या यादीत आणि फरार यादीत समाविष्ट केले असून त्याला धर्मांध मुस्लीम म्हणून जाहिर केले आहे, ज्यामुळे त्याची समाजात अप्रतिष्ठा होऊन त्याच्या मानवी हक्कांचा भंग झालेला आहे.

**आयोगाने केलेली कारवाई :**

दिनांक १८ ऑक्टोबर २०१३ रोजी मा. आयोगाने जिल्हा पोलीस प्रमुख, बुलढाणा यांना नोटीस पाठविली. सदर नोटीसीला प्रतिसाद म्हणून जिल्हा पोलीस प्रमुख, बुलढाणा यांनी विभागीय पोलीस अधिकारी यांचा प्राथमिक चौकशी सोबत तपशीलवार अहवाल सादर केला.

जिल्हा पोलीस प्रमुख, बुलढाणा यांचे अहवालानुसार तक्रारदार हा गुन्हेगार असून त्याचे विरोधात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम तसेच महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा आणि भारतीय दंड विधानाच्या तरतुदींखाली पाच तक्रारींची नोंद झालेली आहे. जिल्हा पोलीस प्रमुख यांच्या अहवालानुसार हा तक्रारदार मुस्लीम समाजातील धर्मांध व्यक्ती असून केवल स्वतःला व त्याचे मुस्लीम समाजाच्या व्यक्तींना फौजदारी तक्रारीपासून वाचविण्याच्या उद्देशाने ही खोटी केस केलेली आहे.

श्री. उमेश पाटील, पोलीस निरिक्षक यांचे निवेदनानुसार तक्रारदारा विरोधातील पाच तक्रारींपैकी वर्ष २००३ आणि २००५ च्या दोन प्रकरणांमध्ये त्याची मुक्तता झालेली असून तीन केसेस ह्या सुनावणीसाठी प्रलंबित आहेत. तक्रारदाराविरोधातील तीन केसेस न्यायालयातील प्रलंबित असल्यामुळे आयोग त्यावर भाष्य करू शकत नाही आणि करणार नाही. परंतु आयोगाची मुख्य चिंता ही आहे की, तक्रारदाराची पार्श्वभूमी व पुर्वइतिहास पाहून त्याला समाजातील असामाजिक घटक आणि धर्मांध मुस्लीम म्हणणे हे आहे.

**आयोगाचा निर्णय :**

तपशीलवार चौकशी केल्यानंतर मा. अध्यक्ष यांनी पुढील आदेश पारित केले.

राज्य सरकारने याबाबत पोलीस अधिकाऱ्यांना कुठल्याही व्यक्तीला जरी त्याचे नाव पोलीस स्टेशनला गुड यादीत (असामाजिक) समाविष्ट असले तरीही त्याला असामाजिक व्यक्ती किंवा विशिष्ट धर्माचा धर्मांध व्यक्ति म्हणून जाहिर करताना योग्य ती काळजी घेण्याचे सूचना देण्यात यावी.

ज्यावेळी आयोगाने मानवी हक्क भंगाविषयक कृतीचा अहवाल मागविला असेल त्यावेळी कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालाची केवळ पुनरावृत्ती न करता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्वतंत्ररित्या चौकशी करणे आवश्यक आहे.

आयोगाला असे आढळते की, तक्रारदाराला असामाजिक, धर्मांध व्यक्ति म्हणून शिक्का मारण्याने त्याची समाजात अप्रतिष्ठा झालेली असून त्याचे मानवी हक्कांचा भंग झालेला असल्याने आयोगाला तक्रारदारास राज्य सरकार मार्फत रुपये ५०,००० नुकसान भरपाई देणे योग्य वाटते. हे आदेश प्राप्त झाल्यानंतर चार महिन्याच्या आत तक्रारदारास भरपाई देऊन त्याचा अहवाल आयोगास सादर करावा.

**११ प्रकरण क्र. ४५३०/२०११-१२**

**तक्रारप्राप्त तारीख :** ०२ जानेवारी २०१२

**तक्रारदार :** मालन शांताराम झोरे

**प्रतिवादी :** पोलीस उपायुक्त परिमंडळ-६, मुंबई

वरिष्ठ पोलीस निरिक्षक, टिळकनगर पोलीस स्टेशन, मुंबई

**तक्रारीचे स्वरूप :**

सदरची तक्रार ही मालन एस. झोरे राहणार भिमनगर, राजावाडी, विद्याविहार, मुंबई यांना टिळकनगर पोलीस अधिकाऱ्यांनी विशेषतः श्री.सिद्धार्थ कसबे, पोलीस निरिक्षक यांनी केलेल्या बेकायदेशीर स्थानबद्धता आणि मारहाण बाबत आहे.

**आयोगाने केलेली कारवाई :**

दिनांक १६ डिसेंबर २०१३ रोजी मा. आयोगाने पोलीस उपायुक्त परिमंडळ ६ यांना नोटीस पाठवली. आयोगाने पाठवलेल्या नोटीसीला अनुसरून पोलीस उपायुक्त परि.६ यांनी स्पष्टपणे संबंधित पोलिसांकडून तथाकथित अत्याचार आणि मारहाणीच्या आरोपांना नाकारणारा अहवाल सादर केला. त्यात पुढे असेही म्हटले की तक्रारदार आणि तिचा मुलगा अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्याशी बेकायदेशीरपणे लग्न करण्याच्या गुन्ह्यात गुंतलेले असल्याने त्यांनी पोलिसांविरुद्ध सूडबुद्धीने हे आरोप केलेले आहेत.

**आयोगाचा निर्णय :**

तपशीलवार चौकशी केल्यानंतर मा. आयोगाने खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत:

राज्य सरकार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोलीस अधिकाऱ्यांमार्फत होणाऱ्या बेकायदेशीर मारहाण आणि संशयीत नागरिकांना थर्ड डिग्री वापरण्याची पद्धत ज्यामुळे भारतीय राज्य घटनेने दिलेल्या संरक्षणांच्या हक्कांचा आणि मानवी हक्कांचा भंग होतो याबाबतीत पोलीस अधिकाऱ्यांमध्ये जागृती निर्माण करावी आणि जर या प्रकारच्या घटना लक्षात येताच असे चुकीचे वर्तन करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरोधात तत्परतेने योग्य ती कारवाई करावी.

मा. आयोग या निर्णयाशी आले की, संबंधित पोलिसांनी तक्रारदाराच्या मानवी हक्कांचा भंग केला आहे. राज्य सरकार तक्रारदारास रुपये ५०,००० नुकसान भरपाई म्हणून देण्यास जबाबदार असून हा आदेश प्राप्त होताच चार आठवडयात कारवाई करून आयोगास पूर्तता अहवाल सादर करावा.

**१२ प्रकरण क्र. ५००९/२०११-१२ (संयुक्त न्यायपीठ)**

**तक्रारप्राप्त तारीख :** ०२ फेब्रुवारी २०११

**तक्रारदार :** शाहीस्ताबी परवीन रहेमान

**प्रतिवादी :** पोलीस अधीक्षक, जिल्हा बुलढाणा

**तक्रारीचे स्वरूप :**

सदरची तक्रार श्रीमती शाहीस्ताबी परवीन रहेमान राहणार देऊळ घाट, ता.जि. बुलढाणा यांनी बुलढाणा पोलिसांनी केलेल्या मानवी हक्क भंगाबाबत आहे. घटनेनुसार दिनांक १६ डिसेंबर २०१० रोजी दुपारच्या वेळी ४ ते ५ पोलीस कर्मचारी तक्रारदाराचे घरी येऊन तिच्या नवऱ्याबद्दल विचारणा केली असता तिचा नवरा घरी नाही असे तिने सांगितल्यावर पोलिसांनी तिला शिवीगाळ करून त्यांनीच तोडलेल्या खुर्चीच्या लाकडी तुकड्यास हातात घेऊन बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली आणि तिच्या घरातील गृहोपयोगी वस्तुंचे नुकसान करून तिच्या घरात ठेवलेले रुपये ३५,००० चोरले. तक्रारदार असेही कथन करते की, त्यावेळी तीला दिवस गेलेले असल्याने तीने याबाबत पोलिसांना वारंवार विनंती केली असता तसेच शेजाऱ्यांनेसुद्धा याबाबत विनंती करून सुद्धा पोलीस तिला निर्दयपणे मारहाण करीत होते. पोलीस स्टेशनला गेल्यावरसुद्धा तक्रारदाराने याबाबत तक्रार केली असता तीला फक्त हॉस्पीटलला तपासणी करता पाठविले परंतु कोणतीही तक्रार दाखल केली नाही.

**आयोगाने केलेली कारवाई :**

दिनांक १८ ऑक्टोबर २०१३ रोजी मा. आयोगाने पोलीस अधीक्षक, जिल्हा परभणी यांना समन्स पाठविले. या नोटीसीला प्रतिसाद म्हणून विभागीय पोलीस अधिकारी, श्रीमती कल्पना बारवाकर यांनी तक्रारदार तिचा नवरा आणि शेजारील लोकांची चौकशी करून त्यांचे जबाब नोंदविले, त्यांनी या प्रकरणात नामोल्लेख करण्यात आलेल्या पोलीस उप निरीक्षक, मनोज केदार आणि तीन पोलीस हेडकॉन्स्टेबल तसेच दोन महिला पोलीस कॉन्स्टेबल यांचेसुद्धा जबाब नोंदविले.

या अहवालाचा मुख्य सार आणि सारांश असा आहे की, पोलीस हे दिनांक १६ डिसेंबर २०१० रोजी तक्रारदाराच्या घराजवळ गेले असल्याचे नाकारले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार पोलिसांना विश्वासनियरित्या माहिती मिळाली होती की तक्रारदाराचा नवरा शेख रहेमान शेख लुकमान हा इतर व्यक्तिसोबत तेथे वरळी मटका नावाचा जुगार चालवित असल्याने त्याला रंगेहात पकडण्यासाठी पोलीस त्याचे घरी गेले असता जुगार चालविणारा तक्रारदाराचा नवरा शेख रहेमान आणि त्याचे साथीदार त्याठिकाणाहून पळून गेले. पुढे असेही म्हटले की शेख रहेमान हा पळण्यात यशस्वी झाला परंतु त्याचे काही साथीदार यांना जागेवर अटक करून त्यांचेकडून रोख रक्कम, मोबाइल फोन, जुगाराच्या चिठ्ठया असे महत्त्वाचे वस्तू जप्त करण्यात येऊन गुन्हा नं. ३०४०/२०१० हा तक्रारदाराचा नवरा आणि इतरांविरोधात नोंदविण्यात आला. पुढे असेसुद्धा म्हटले आहे की, यासारख्या अनेक तक्रारी केवळ तक्रारदाराच्या नवऱ्याविरुद्ध नव्हे तर कुटुंबातील इतर व्यक्तींविरुद्ध नोंदलेल्या आहेत. पुढे असेही म्हटले आहे की, छापा मारणारी पोलीस पार्टीने फक्त घराच्या समोरील मोकळया जागेत ही कारवाई केली असून त्यांनी कधीच शेख रहेमान यांच्या घरात प्रवेश केला नाही तसेच

तक्रारदाराला मारहाण केली नाही आणि पैसेही चोरले नाहीत. पुढे असेही म्हटले आहे की, तक्रारदाराच्या नवऱ्या विरोधात तक्रारी दाखल असल्यामुळे तक्रारदाराने ही खोटी तक्रार दाखल केली आहे.

**आयोगाचा निर्णय :**

सखोल चौकशी केल्यानंतर मा. अध्यक्ष यांनी असे मत नोंदवले की संबंधित पोलिसांनी गरोदर स्त्रीला बेकायदेशीररित्या अटक करून कोठडीत ठेऊन निर्दयपणे मारहाण केली. फक्त तिचा नवरा हा जुगार चालविणारा होता एवढाच तिचा दोष होता. याप्रकारे एक गरोदर आणि निष्पाप स्त्रीला मानसिक आणि शारिरीक यातना देऊन संबंधित पोलिसांनी मानवी हक्क भंगाची कृती केलेली आहे. या परिस्थितीत आयोग खालील आदेश देत आहे.

राज्य सरकारने सर्व पोलीस अधिकाऱ्यांना स्वतंत्र नागरिकांच्या मानवी हक्कांचा आदर करण्याचा आणि निर्दयपणे मारहाण न करण्याच्या सूचना द्याव्यात.

छापा टाकण्याच्या परिस्थितीत सुद्धा पोलिसांनी कथीत गुन्हेगारांचे कुटुंबाचे सदस्य विशेषतः त्यांचा गुन्ह्याशी संबंध नसेल अशावेळी स्वतःला मर्यादेत ठेवावे.

श्रीमती शाहीस्ताबी परवीन शेख रहेमान यांच्या मानवी हक्कांच्या भंगासाठी रुपये १,००,००० नुकसान भरपाई म्हणून अन्यायग्रस्त व्यक्ती शाहीस्ताबी परवीन शेख रहेमान यांना हे आदेश प्राप्त होताच चार आठवडयात देऊन त्याचा पूर्तता अहवाल सादर करावा.

**१३ सुमोटो प्रकरण क्र. १/२०१३ (संयुक्त न्यायपीठ)**

**तक्रारप्राप्त /दखल तारीख :–** २१ सप्टेंबर २०१३

**संदर्भ :** 'टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई दिनांक २० सप्टेंबर २०१३ च्या आवृत्तीतील चार मुले अंगावर ॲसिड सांडून जखमी झाल्याची बातमी'

**प्रतिवादी :**
१. प्रादेशिक परिवहन आयुक्त, मुंबई
२. पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई
३. महापालिका आयुक्त, मुंबई

**विषयाचे स्वरूप :**

आयोगाने सदरची तक्रार ही टाईम्स ऑफ इंडिया दिनांक २० सप्टेंबर २०१३ मधील बातमीच्या आधारे "टेम्पोमधून हायड्रोक्लोरिक ॲसिड कांदिवली येथील एका व्यक्तीच्या गोदामात घेऊन जात असताना चार मुलांच्या अंगावर उडून त्यांना भाजल्याच्या जखमा झाल्याबाबत" सुमोटो / स्वयंखुद्द दखल घेतलेली आहे.

**आयोगाने केलेली कारवाई :**

दिनांक २१ सप्टेंबर २०१३ रोजी मा. आयोगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई, पोलीस आयुक्त मुंबई आणि मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना नोटीसा पाठविल्या. या नोटीसींना अनुसरून मुंबई महानगरपालिका आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांनी त्यांचा तपशीलवार अहवाल सादर केला. प्रादेशिक परिवहन विभागाने अहवालात असे म्हटले की त्यांनी चौकशी केली असून ॲसिड वाहून नेणारे वाहन हे एका व्यक्तिच्या मालकीचे असून त्या वाहनाच्या कागदपत्राबाबत प्रादेशिक परिवहन विभागाला कोणताही बेकायदेशीरपणा किंवा अनियमितता आढळून आलेली नाही.

जोपर्यंत पोलीस विभागाचा संबंध येतो, त्याबाबत पोलिसांनी अहवाल दिला की, त्यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी ताबडतोब वाहनाचे मालक आणि चालक यांचेविरोधात गुन्हा नं. २५७/१३ अंतर्गत कलम २८५, ३३८ सोबत ३४ भा.द.वि. तसेच मुंबई महानगरपालिका कलम (३९४ आणि ४७१) नुसार गुन्हा नोंदविला असून त्या गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

**आयोगाचा निर्णय :**

आयोगाने याबाबत तपशीलवार चौकशी केली असता आयोगास आढळले की, याबाबत एकूण महानगरपालिका अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा विशेषतः ॲसिड किंवा ज्वलनशील पदार्थ साठविण्यासाठी परवाना देणारा विभाग जबाबदार असून त्याचा परिणाम म्हणून निष्पाप मुले जखमी झाली आहेत. म्हणून आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

मुंबई महानगरपालिकेला आम्ही निर्देशित करीतो की, जखमी झालेल्या चारही मुलांना प्रत्येकी रुपये १०,००० नुकसान भरपाई म्हणून हा आदेश प्राप्त झाल्यानंतर चार आठवडयात देऊन त्याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करावा.

**१४ सुमोटो प्रकरण क्र. ४/२०१३**

**तक्रारप्राप्त /दखल तारीख :—** ३० सप्टेंबर २०१३

**संदर्भ :** " इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्राच्या, दिनांक २५ सप्टेंबर २०१३ च्या आवृत्तीतील बातमीत " नाशिक विभागात (अतिवृष्टीमुळे) पावसाच्या थैमानाने लोकांच्या जिवीत आणि मालमत्तेचे नुकसान".

**प्रतिवादी :** विभागीय महसूल आयुक्त, नाशिक.
जिल्हाधिकारी, नंदूरबार, धूळे, जळगाव आणि नगर

**विषयाचे स्वरूप :**

सदरची तक्रार ही आयोगाने सुमोटो /स्वयंखुद्द दखल घेतलेली असून ती इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्र, दिनांक २५ सप्टेंबर २०१३ मधील बातमी नाशिक विभागात पावसाच्या अतिवर्षावामुळे लोकांच्या जिवीत आणि मालमत्तेचे नुकसानीबाबत या भागात वस्तुतः किती नुकसान झाले आणि सरकारी यंत्रणेने कुठल्याप्रकारे मदतकार्य केले हे पाहण्याच्या उद्देशाने दखल घेतली.

**आयोगाने केलेली कारवाई :**

मा. आयोगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग आणि इतरांना या बाबत नोटीस पाठविल्या.

यासंदर्भात संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस देण्यात आल्या आणि नंदूरबार जिल्ह्याव्यतिरीक्त इतर सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत त्यांनी केलेल्या उपाय योजनेबाबत तपशीलवार अहवाल सादर केला.

**आयोगाचा निर्णय :**

मा. अध्यक्ष यांनी खालील आदेश पारित केले.

शासन परिपत्रक क्र. सीएलएस/२०१३/५२१/ प्र.क्र. २५५/एम-जे हे विचारात घेऊन त्याल सुधारणा करून अतिवृष्टीच्या काळात किंवा विजांचा आघात सारख्या नैसर्गिक आपत्तीत हरवलेल्या प्रत्येक छोट्या व मोठया जनावरांच्या प्रमाणात नुकसानात एकसारखी नुकसान भरपाई द्यावी, मुळात नाशिक विभागात पूर्वीच सूचविण्यात आलेली आहे.

सरकारने, ओझर गावच्या रहिवाशी श्रीमती लक्ष्मीबाई काळे यांचे कुटुंबास नुकसान भरपाई म्हणून रुपये १,५०,००० लवकरात लवकर ज्याप्रमाणात त्यासारख्या नैसर्गिक आपत्तीत आपतग्रस्तांना देण्यात येते त्याप्रमाणात देण्यात यावेत अशी शिफारस आयोगाने केली.

सरकारने नुकसान भरपाई म्हणून नाशिक जिल्हयातील घरांच्या नुकसानी बद्दल प्रत्येक मालकांस त्याच्या घराच्या झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात कमीत कमी रुपये २,००० व जास्तीत जास्त रुपये ५,००० द्यावेत.

सरकारने, अहमदनगर जिल्ह्यातील रहिवाशी श्रीमती अमृत रखमाजी वाघाचवरे यांचे कुटुंबास नैसर्गिक आपत्तीत नुकसान भरपाई म्हणून रुपये १,५०,००० देण्याची शिफारस आयोग करीत आहे.

सरकारने मयत झालेल्या जनावराच्या मालकास प्रत्येकी रुपये २५,००० नुकसान भरपाई म्हणून द्यावी.

प्रकरण- ८

**मानवी हक्कांचे महत्त्व आणि संकल्पना**

मानवी हक्क कायदा, १९९३ कलम १२ प्रमाणे आयोग हक्कासाठी आयोग खालील सर्व किंवा त्यापैकी कोणतेही कार्य पार पाडील.

१. स्वतःहून अन्यायग्रस्त प्रकरणात चौकशी करणे किंवा अन्यायग्रस्त व्यक्तीच्या अर्जावर चौकशी करणे.

(अ) मानवी हक्कांचा भंग किंवा त्यास अपप्रेरणा देणे किंवा;

(ब) अशा हक्क भंगास प्रतिबंध करण्यास लोकसेवकाकडून झालेला निष्काळजीपणा.

२. मानवी हक्कांचा भंग झाल्याच्या कोणताही आरोप असलेल्या व कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या न्यायालयाच्या संमतीने हस्तक्षेप करील;

३. राज्यशासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरुंगात किंवा अन्य एखादया संस्थेत उपचाराच्या, सुधारण्याच्या किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ व्यक्तीस स्थानबद्ध केलेले किंवा ठेऊन घेण्यात आलेले असेल त्या तुरुंगाला वा संस्थेला राज्य शासनाला सूचना देऊन त्या आवासी व्यक्तींच्या तेथील राहनिमानाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भेट देईल आणि त्यासंबंधी शिफारस करेल;

४. संविधानाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पूरवण्यात आलेल्या संरक्षक उपायांचा आढावा घेईल व त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाय योजनांची शिफारस करील;

५. मानवी हक्कांच्या उपभोगामध्ये प्रतिबंध करणाऱ्या दहशतवादी कृत्यास असलेल्या घटकांचे, पुनर्विलोकन करून त्यावर उचित सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करील;

६. मानवी हक्काच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेईल व त्यास चालना देईल ;

७. मानवी हक्कांबाबतची जाण समाजाच्या विविध वर्गात निर्माण करण्यासाठी जागृती करणे आणि प्रकाशने, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधने याद्वारे मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षक उपाययोजनांची माहिती करून देण्यासाठी चालना देईल ;

८. मानवी हक्कांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संघटना आणि संस्था यांना ते काम करीत असलेल्या प्रयत्नांना उत्तेजन देईल; आणि

९. खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थांना प्रोत्साहन देणे, मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करील.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई